| | |
|---|---|
| | **दिवाणी किरकोळ अर्ज ६/२०२४**<br>**शहाजी गणपती पाटील**<br>**वि.**<br>**कोणीही नाही.** |

## <u>नि. ९ वरील आदेश</u>

१. प्रस्तुत अर्ज त्रयस्थ पक्षकार यांनी दिवाणी किरकोळ अर्जामध्ये त्यांना सामनेवाला म्हणून समाविष्ट करुन घेण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जास अर्जदार यांनी नि. १२ येथे त्यांचे म्हणणे दाखल करून अर्जास तीव्र विरोध दर्शविला आहे.

३. त्रयस्थ पक्षकार तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, त्रयस्थ पक्षकार बळवंत तुकाराम पाटील हे ज्ञानू म्हादू पाटील यांचे सख्ये पुतणे आहेत. सदर ज्ञानू म्हादू पाटील यांचा दि. ०६.०६.२०१७ रोजी मृत्यू झाला होता. मूळ ज्ञानू म्हादू पाटील यांचे अर्जदार सोबत त्रयस्थ पक्षकार बळवंत तुकाराम पाटील हे हिंदू वारस अधिनियम वर्ग–२ चे वारस आहेत. त्यामुळे सदर कामी त्रयस्थ पक्षकार यांना या अर्जाच्या कामी समाविष्ट करून घेणे अत्यंत गरजेचे आहे. मुळातच त्रयस्थ पक्षकार यांनी ज्ञानू म्हादू पाटील यांचा देखभाल व सांभाळ केलेला आहे. तसेच सदर अर्ज हा त्रयस्थ पक्षकार यांना न घेता निकाल झाल्यास त्रयस्थ पक्षकार यांचे कायदेशीर हक्क डावलल्यासारखे होणारे आहे. मुळातच अर्जदार यांनी कोर्टाची दिशाभूल करून वारस प्रमाणपत्र घेण्याकरिता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्रयस्थ पक्षकार यांच्या घरी ज्ञानू म्हादू पाटील हे राहत होते. त्यांचे औषधपाणी तसेच देखभालीचा खर्च हा त्रयस्थ पक्षकार यांनी केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत कामी त्रयस्थ पक्षकार हे हिंदू वारसा अधिनियमातील तरतुदीनुसार वर्ग – २ चे वारस असल्यामुळे त्यांना या कामी सामील करून घेणे गरजेचे आहे. तसेच त्रयस्थ पक्षकार यांना सामील करून न घेतल्यास दाव्याची गुंतागूंत वाढणारी आहे. मुळातच

अर्जदार यांनी सदरचा अर्ज हा ज्ञानू म्हादू पाटील यांचे घर मिळकत क्र. ४२९ च्या सदरी नाव लावून घेण्याकरिता दाखल केलेला आहे. तसेच सदरचे वारसा प्रमाणपत्र त्यांना कोणत्या कारणांसाठी हवे आहे याचा कसलाही लेखी खुलासा अर्जदार यांनी दिलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जदार हे योग्य बाजू घेवून कोर्टासमोर आलेले नाहीत. त्यामुळे सदर कामी त्रयस्थ पक्षकार बळवंत तुकाराम पाटील यांना सामील करून घेणे गरजेचे आहे. अंतिमतः त्रयस्थ पक्षकार तर्फे वकील यांनी सदरचा अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

४. अर्जदार तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, मुळातच त्रयस्थ पक्षकार यांनी दाखल केलेला अर्ज हा खोटा, लबाडीचा व बेकायदेशीर आहे. तसेच भारतीय पुरावा कायद्याची त्यास बाधा येत असल्यामुळे तो नामंजूर होणेस पात्र आहे. मुळातच त्रयस्थ पक्षकार यांचा मयत ज्ञानू म्हादू पाटील यांच्याशी कसलाही संबंध नव्हता व नाही. त्रयस्थ पक्षकार हे कधीही मयत ज्ञानू म्हादू पाटील यांचे वर्ग–२ मधील वारस नव्हते व नाहीत. मुळातच अर्जदार यांचे दोन्ही चुलते ज्ञानू म्हादू पाटील व तुकाराम म्हादू पाटील हे अविवाहीत मयत झाले. त्यामुळे सदर अर्जाच्या अनुषंगाने केवळ त्रयस्थ पक्षकार हे कोर्टासमोर दिशाभूल करण्याच्या हेतूने आलेले आहेत. मुळातच ज्ञानू म्हादू पाटील व तुकाराम म्हादू पाटील यांचा विवाह झाल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा त्रयस्थ पक्षकार यांनी दाखल केलेला नाही. उलटपक्षी त्रयस्थ पक्षकार हे भाटे कुटूंबातील असून त्यांचा मयत ज्ञानू पाटील यांच्याशी कसलाही संबंध नाही. तसेच त्रयस्थ पक्षकार यांनी कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडे केलेले शपथपत्र केवळ स्वतःच्या फायद्याकरिता नाव लावायच्या उद्देशाने केल्याचे स्पष्ट दिसून येणारे आहे. त्यामुळे त्रयस्थ पक्षकार हे कोणताही सखोल पुरावा घेवून आलेले नाहीत. तसेच त्रयस्थ पक्षकारांच्या बाबत गाव पोलीस पाटील यांनी त्यास दिलेला दाखला ग्राह धरणेत येवू नये असा दाखल दिलेला आहे. तसेच प्रस्तुत अर्जदाराने सदर अर्ज दाखल केल्यानंतर त्रयस्थ पक्षकार यांनी गॅझेट करून सन २०२४ मध्ये स्वतःचे नाव बदलून घेतले आहे. त्यामुळे सदर कामी त्रयस्थ

पक्षकार यांना दावा मिळकतीबाबत कोणताही अधिकार नाही. त्यामुळे त्यांनी दाखल केलेला अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. अंतिमतः अर्जदार तर्फे वकील यांनी सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

५. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने दोन्हीं बाजूकडील वकिलांचा युक्तीवाद ऐकला. या कामी त्रयस्थ पक्षकार यांनी पुढील कागदपत्रे हजर केली आहेत.

| अनु. क्र. | वर्णन |
|---|---|
| १. | यशवंत सहकारी बँक मर्यादित कुडित्रे यांची पासबुक झेरॉक्स प्रत |
| २. | यशवंत सहकारी बँक शाखा कळे बचत खाते झेरॉक्स प्रत |
| ३. | ज्ञानू म्हादू पाटील यांच्या आधारकार्डची झेरॉक्स प्रत |
| ४. | दि. ३१.०१.२०११ रोजीच्या नोंदणीकृत खरेदीपत्राची झेरॉक्स प्रत |
| ५. | दि. ११.०८.२०२४ रोजी पोलीस पाटील यांनी दिलेल्या दाखल्याची झेरॉक्स प्रत |
| ६. | एकत्रिकरण अर्ज उप विभागीय पन्हाळा झेरॉक्स प्रत |
| ७. | नाव बदलल्याबाबतचे राजपत्र प्रत |
| ८. | दि. ०३.१२.२०२४ चा गाव कामगार पोलीस पाटील यांचा रहिवासी दाखला |
| ९. | जाहीरनामा |
| १०. | ग्रामपंचायत बोरगाव दाखला दि. १६.०२.२०२४ |
| ११. | तहसिलदार प्रतिज्ञापत्र दि. ०४.१०.२०१८ झेरॉक्स प्रत |
| १२. | ग्रामपंचायत बोरगाव असेसमेंट उतारा सहीसूद नक्कल |

६. या अर्जाच्या अनुषंगाने मूळ अर्जदार यांनी पुढील कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

| अनु. क्र. | वर्णन |
|---|---|
| १. | तुकाराम महादेव पाटील मृत्यू दाखला सहीसूद नक्कल |
| २. | गणपती महादेव पाटील मृत्यू दाखला सहीसूद नक्कल |
| ३. | यशवंत तुकाराम भाटे बोनाफाईड सर्टिफिकेट झेरॉक्स प्रत |
| ४. | ग्रामपंचायत बोरगाव प्रमाणपत्र दि. ०५.०६.२०२४ |
| ५. | दि. ०७.०९.२०२४ रोजी गाव कामगार पोलीस पाटील बोरगाव यांनी दिलेला दाखला |

७. वरील सर्व कागदपत्रांचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता ही गोष्ट दिसून येणारी आहे की, सदर त्रयस्थ पक्षकार यांच्याबाबत पोलीस पाटील बोरगाव यांनी त्रयस्थ पक्षकार यांना देण्यात आलेला दाखल ग्राहय धरू नये असा दाखला दि. ०७.०९.२०२४ रोजी दिलेला दिसून येत आहे. तसेच त्यानंतर ऑक्टोबर १७ – २३ सन २०२४ या कालावधीच्या राजपत्राद्वारे त्रयस्थ पक्षकार यांनी त्यांचे नाव बदलून घेतल्याचे दिसून येत आहे. त्यानंतर दि. ०३.१२.२०२४ रोजी गाव कामगार पोलीस पाटील यांनी त्यांना दाखला प्रदान केला. मुळातच अर्जदार यांनी या कामी त्यांचे दोन्ही चुलते ज्ञानू म्हादू पाटील व तुकाराम म्हादू पाटील हे अविवाहित असल्याबाबतचा ग्रामपंचायतीचा दाखला दाखल केलेला आहे. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता त्रयस्थ पक्षकार हे कशा प्रकारे ज्ञानू म्हादू पाटील यांचे नातेवाईक आहेत, तसेच ते कोणत्या आधारे याबाबत दाद मागत आहेत ते समजून येत नाही.

८. मुळातच प्रस्तुत त्रयस्थ पक्षकार यांनी राजपत्राद्वारे त्यांचे नाव बदललेले दिसून येते. मुळातच कायद्यातील प्रस्थापित तत्वानुसार एखाद्या व्यक्तीने एखादे नाव धारण केले म्हणजे ती व्यक्ती त्या दुसऱ्या व्यक्तीचा कायदेशीर वारस होवू शकत नाही. मुळातच कायदेशीर तत्वानुसार सदरच्या व्यक्तीला त्याचे नातेसंबंध दाखविणे तितकेच गरजेचे ठरते. मात्र प्रस्तुत कामी त्रयस्थ पक्षकार यांनी म्हादू ज्ञानू पाटील यांच्या सोबत त्यांचे नाते कशा पद्धतीचे होते हे कोणत्याही प्रकारे अभिलेखावर आणलेले नाही. तसेच सदर त्रयस्थ पक्षकार हा ज्ञानू म्हादू पाटील यांचा वारसदार कसा ठरतो हे देखील समजून येत नाही. केवळ सदर पक्षकार हा न्यायालयात हजर होवून अर्जास विरोध करत आहे म्हणून त्यास पक्षकार म्हणून दाखल करून घेणे योग्य होणार नाही असे वाटते. तसेच त्रयस्थ पक्षकाराचा पुरावा हा देखील सबळ दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुत त्रयस्थ पक्षकार यांचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे असे वाटते. सबब मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

**त्रयस्थ पक्षकार यांचा नि. ९ वरील अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.**

**सही/-**

पन्हाळा
दि. २३.०९.२०२५

**के. दि. काकतकर**
सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पन्हाळा